Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIV Issue – II March - April 2025

# गणेशनगर केंद्रातील शिक्षकांच्या शाळाबाह्य कामांमुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर होणाऱ्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास

संशोधकाचे नाव
श्री. वैभव दत्तात्रय गोसावी
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

मार्गदर्शकाचे नाव
डॉ. दादासाहेब मोरे
*(एम.एस्सी.एम.एड.पी.एच.डी)*
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

**समस्येची पार्श्वभूमी**

शिक्षण म्हणजे ज्ञान आणि कौशल्ये यांचे प्रसारण आणि चारित्र्य गुणांचा विकास होय.शिक्षण ही प्रत्येक मानवाची प्राथमिक गरज बनली आहे.या गरजेच्या पूर्ततेसाठी शासन स्तरावर असंख्य योजना ही कार्यरत आहेत. शालेय विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी तथा त्यांच्या गुणवत्तेत वाढ होण्यासाठी मुलं शाळेत टिकवण्यासाठी किंवा तळागाळातील सर्व मुलांना शाळेत आणण्यासाठी विविध योजना,उपक्रम,कार्यक्रम शासनस्तरावर निश्चित होतात आणि टप्प्याटप्प्याने सर्वच शाळा ते यथायोग्य राबवले जातात. हे वर्षानुवर्षे घडताना आपल्या लक्षात येत आहे.इतर देशांची अथवा राज्यांची ही तुलना यात अंतर्भूत होते हे नाकारता येणार नाही. काहीही करून सर्व उपक्रम योजना या कोणासाठी राबवत आहोत...? तर याचे उत्तर फक्त एकच आहे की विद्यार्थी हितार्थ...!

cc BY Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's licensed Based on a work at http://www.goeiirj.com

प्राथमिक स्तर असो की माध्यमिक स्थर,खाजगी शाळा असो की विनाअनुदानित अथवा शासकीय शाळा या योजना विद्यार्थी हितार्थ सगळीकडेच बंधनकारक केल्या जातात. तथापी या सगळया राबवण्याची औपचारिक जबाबदारी येते ती स्थानिक शिक्षकांवर.विद्यार्थी लाभाच्या योजना गुणवत्तेवर आधारित प्रासंगिक उपक्रम,सामाजिक जनजागृती,विद्यार्थी स्वच्छता,संस्कारीक उपक्रम अशा अगणित परिपत्रकांचा मारा दररोज शाळांमध्ये चालू असलेला आपल्या निदर्शनास येतो.याउलट काहीही करा पण मुलं गुणवान व्हावीतच हाच मतितार्थ यातून स्पष्ट होतो.यातील अनेक योजना दीर्घकालीन,काही कायमस्वरूपी, काही प्रासंगिक स्वरूपाच्या असतात आणि या सर्व त्यात शिक्षकांना त्याच मोजक्या विद्यार्थ्यांवर अनेक प्रकारे राबवाव्या लागतात.आत्ताच्या तंत्रज्ञानाच्या युगात व्हाट्सअप सारख्या विविध ॲप्स व तंत्रज्ञानाच्या विविध माध्यमातून डिजिटल परिपत्रके,अगणित लिंक्स,विविध फॉर्मेट्स, साधने प्रत्येक क्षणाला येऊ लागली आहेत. ही सद्यस्थिती कोणालाही नाकारता येणार नाही.वर्तमानपत्रातून अशा शाळाबाह्य 151 कामांत आपल्याला प्राथमिक शिक्षक अडकलेला प्राथमिक दृष्ट्या लक्षात येते.त्यात शाळा उघडण्यापासून शौचालयाच्या स्वच्छतेपर्यंत असंख्य कामे आहेत त्यातील काही कामे पुढीलप्रमाणे आपल्याला सांगता येतील.....घंटा वाजवणे,बांधकाम करणे,गॅस

आणणे,पिण्याचे पाण्याची व्यवस्था करणे,अनेक प्रकारची निवडणूक कामे पार पाडणे, हॅन्डवाश सुविधा पुरवणे,,शालेय पोषण आहार विविध सर्वेक्षणे विविध अहवाल विविध लिंक भरणे विविध समित्या स्थापन करणे त्यांचे इतिवृत्त ठेवणे त्यांचे जतन करणे, तंटामुक्ती,ग्रामसभा,करारनामे,साठा नोंदी, वजन उंची घेणे, मासिक अहवाल लिहिणे,आरोग्य तपासण्या, गोळ्यावाटप, कृती आराखडे,विविध योजनांचे अभिलेखे,आवक जावक रजिस्टर, कॅशबुक, आर्थिक व्यवहार यांसारख्या असंख्य कामांचा समावेश होतो.

असंख्य परिपत्रके ,अनेक योजना अनेक उपक्रम पण राबवणारा मात्र एकच शिक्षक आणि तेच विद्यार्थी ही मोजकीच यंत्रणा अशी अवस्था सगळीकडे पहावयास मिळत आहे .अशैक्षणिक कामांच्या वाढत्या प्रभावामुळे शिक्षकांचे मानसिक संतुलन बिघडत आहे व ही कामे नकोसे वाटत असल्यामुळे कधीकधी शासनाला बोगस अहवाल पाठवले जाऊ शकतात. या सगळ्या कालावधी दरम्यान विद्यार्थ्यांचे शिक्षण हा पायाभूत घटक कुठे दुर्लक्षित झाला, हे अनावधानाने लक्षातही येत नाही.म्हणजेच अनेक शाळाबाह्य कामांचा ताण शिक्षकांवर आणि सहाजिकच त्यांच्या अध्यापनावर आणि विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर झालेला दिसून येत आहे तथापि याचा विपरीत परिणाम विद्यार्थ्यांच्या शिकण्यावर,अध्ययनावर, त्यांच्या गैराहाजेरीवर,पट कमी होण्यावर होत असलेला आपल्याला लक्षात येत आहे. याविषयी माहिती जाणून प्रस्तुत संशोधन लेखनासाठी हाती घेण्यात आले.

**महत्वाचे शब्द**

अ.) **गणेश नगर केंद्र-** अहिल्यानगर जिल्ह्याच्या उत्तर विभागातील राहाता या एका तालुक्यातील बारा केंद्रांपैकी एक केंद्र म्हणजे गणेशनगर होय .

ब ) **शिक्षकांची शाळाबाह्य कामे-** औपचारिक व अनौपचारिक कामे करत असताना अध्यापन या मूळ कार्याखेरीज कराव्या लागणाऱ्या इतर कामांना शाळाबाह्य कामे असे म्हणता येईल.

क ) **अध्ययन-** ज्या प्रक्रियेच्या माध्यमातून ज्ञान व अनुभवांचे संपादन केले जाते आणि सुयोग्य वर्तन विविध कौशल्य अभिरुद्धी व मूल्ये यांचा विकास साधला जातो या प्रक्रियेस अध्ययन असे म्हणता येईल.

ड ) **अध्ययनावर परिणाम-** डेविड असूबेल यांच्या मते विद्यार्थी आपल्या बुद्धीनुसार ज्ञान व माहिती साठवण्याचा प्रयत्न करत असतो यासाठी त्याच्यामध्ये कार्यक्षम यंत्रणा असते ही यंत्रणा सुरळीत चालणे व न चालणे म्हणजेच परिणाम होय.

इ ) **चिकित्सक अभ्यास-** चिकित्सक अभ्यास म्हणजेच एखाद्या शैक्षणिक समस्येचे अथवा विषयाचे तपशीलवार ज्ञान होय.

**संशोधन लेखनाचा मुख्य भाग**

शिक्षक म्हणून अनेक शाळाबाह्य कामांमुळे मुख्य कार्यासाठी शिक्षकांना वेळच मिळत नसल्याचे आपण पाहतो आणि सर्वत्र हेच चित्र पहावयास मिळत आहे.शाळाबाह्य अनेक कामांच्या जंत्रीत अनेक अडचणींचा सामना करत त्यातून मार्ग काढत वेळ मिळाल्यास अध्यापनाकडे त्याला जावे लागते.असंख्य शाळाबाह्यकामे शिक्षकांना करावी लागतात.याचा इत्यंभूत अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत संशोधनात मी राहाता तालुक्यातील गणेशनगर केंद्रातील बारा शाळांमधून ३० विद्यार्थ्यांची व १५ शिक्षकांची न्यादर्श म्हणून निवड करण्यात आली आहे..प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा

अवलंब केला आहे..सर्वेक्षण संशोधनात उपक्रमाच्या सद्यस्थितीचा सर्वंकष अभ्यास करून प्रगतीचा आढावा घेण्यात येतो आणि विश्लेषणात्मक वर्णन केल्या जाते.यासाठी मी स्वतः काही मुद्यांच्या आधारे प्रश्नावली तयार केली आहे.प्रश्नावली 5 तज्ञांकडून तपासून घेतली आहे. मी माझ्या गणेशनगर केंद्रातील **सहेतुक नमुना निवड पद्धत** वापरुन बारा शाळांमधील ३० विद्यार्थ्यांची यासाठी निवड करणार आहे.तसेच केंद्रातील **प्रासंगिक नमुना निवड पद्धत** वापरुन १५ शिक्षकांची यासाठी (मुलाखत)निवड केली आहे.तसेच विद्यार्थ्यांसाठी सर्वेक्षण आणि शिक्षकांसाठी मुलाखत ही तंत्र मी वापरले आहे.

संशोधकाने प्रश्नावली द्वारे माहिती मिळवली आहे व तिचे विश्लेषण करन्यासाठी सादरीकरण व शेकडेवारी ही संख्याशास्त्रीय पद्धती वापरली आहे.वरील प्रमाणे विस्तृत माहितीचे विश्लेषणानंतर पुढील काही निष्कर्ष मला काढता आले.गणेशनगर केंद्रातील शिक्षक त्यांच्या अध्यापणाचे नियोजन करतात. तथा विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबवतात.अशैक्षणिक कार्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. जो वेळ मुलांसाठी द्यायला हवा आहे तो इतर कामांसाठी द्यावा लागतो. शिक्षकांच्या मते अशैक्षणिक कामे बंद केली तर मुलांना अध्ययन व अध्यापनासाठी वेळ देता येईल.गुणवत्ता अनेक पटींनी सुधारेल.शिक्षकांची अशैक्षणिक कामे आणि मुलांची गुणवत्ता तथा अध्ययनावर होणारा परिणाम यांचा परस्पर संबंध आहे. अशैक्षणिक कामे करण्यासाठी शासनाने इतर पर्यायी व्यवस्था उभी करावी.

शासनाने उपरोक्त सत्य परिस्थितीचा गंभीर्यापूर्ण विचार करून योग्य ते प्रयत्न राबवणे अत्यंत गरजेचे वाटते.माझ्या गणेशनगर केंद्रातील विद्यार्थ्यांच्या सर्वेक्षण आणि शिक्षकांच्या मुलाखतीतून मी या विषयाला जाणण्याचा आणि न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे.

**संदर्भ ग्रंथ**

1. अध्ययन निष्पत्ती प्राथमिक स्तर,महा.राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यास संशोधन मंडळ पुणे.
2. बापटभा.गो.(१९८८),शैक्षणिक संशोधन,तिसरी आवृत्ती,पुणे,नूतनप्रकाशन.
3. भितांडे वि.रा.,(१९९९)शैक्षणिक संशोधन पद्धती (द्वितियावृत्ती),पुणे,नूतन प्रकाशन.
4. डॉ.देशपांडे प्रकाश ,मूल्यमापन व मूल्यनिर्धारण (बी एड.)नाशिक
5. डॉ.खोंडे कैलास,डॉ.भागवत शिंदे.,शैक्षणिक प्रशासन व नेतृत्व (एम ए शिक्षणशास्त्र)
6. मुळे रा.रा.आणि उमाठे वि.तू.(१९९८),शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे
7. प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २००४ (२०१०),महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,पुणे.
8. डॉ.तपकीर दत्तात्रय व इतर,अध्ययनार्थी व त्याचा विकास बी.एड.(EDU401),नाशिक

**संकेतस्थळे**

1. www.wikipedia.org
2. www.shodhganga.org
3. www.maharashtra.gov.in
4. www.unipune.ac.in
5. http://www.ericsearch.org